१६ फ़ेब्रुवारी २०१७

प्रसिद्धी पत्रक

# बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक २०१७

## उमेदवारांचे गुन्हेगारी, आर्थिक आणि इतर पार्श्वभूमीचे विश्लेषण

असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स

टी-९५ए, सी.एल.हाऊस, १ला मजला,
गुलमोहर कमर्शियल कॉम्प्लेक्सजवळ
गौतम नगर,
नवी दिल्ली-११० ०४९
फोन: +९१-०११-४१६५-४२००
फॅक्स: +९१-११-४६०९४२४८
इमेल: adr@adrindia.org

निवडणुकीदरम्यान आचरसंहितेच्या कुठल्याही उल्लंघनाची आणि गैरव्यवहाराची सूचना देण्यासाठी इलेक्शन वॉच रिपोर्टर डाऊनलोड करा (अँड्रॉईड ऍप)
https://play.google.com/store/apps/details?id=com.webrosoft.election_watch_reporter

# संक्षेप आणि ठळक मुद्दे

**महाराष्ट्र इलेक्शन वॉच** आणि **असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स (एडीआर)** यांनी **बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या** २२७ प्रभागांमध्ये २२७ सीटांसाठी होणाऱ्या **२१ फ़ेब्रुवारी २०१७** च्या निवडणुकीमध्ये भाग घेणा-या **२२७५** उमेदवारांपैकी **१६४१** उमेदवारांच्या प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण केले. बाकीची प्रतिज्ञापत्र विश्लेषित केली नाहीत कारण हा अहवाल बनवेपर्यंत ती संकेतस्थळावर टाकली गेली नव्हती.

## गुन्हेगारी पार्श्वभूमी

- **गुन्हेगारी प्रकरणं असलेले उमेदवार:** विश्लेषित केलेल्या १६४१ उमेदवारांपैकी २१६ (१३%) उमेदवारांनी त्यांच्या विरोधात गुन्हेगारी प्रकरण दाखल असल्याचे घोषित केले आहे.

- **गंभीर गुन्हेगारी प्रकरण असलेले उमेदवार**: वरील १६४१ उमेदवारांपैकी १५४ (९%) उमेदवारांनी त्यांच्या विरोधात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याचे घोषित केले आहे ज्यामध्ये खून, खुनाचा प्रयत्न, अपहरण, दरोडा, दादागिरी / खंडणी, इत्यादी गुन्ह्यांचा समावेश आहे.

- **गुन्हेगारी प्रकरणं दाखल असलेले पक्षवार उमेदवार**: शिवसेनेच्या विश्लेषित केलेल्या १७३ पैकी ४१ (२४%), काँग्रेस (आय) च्या विश्लेषित केलेल्या १७१ पैकी १९ (११%), मनसेच्या विश्लेषित केलेल्या १५४ पैकी ३९ (२५%), भाजपच्या विश्लेषित केलेल्या १५१ पैकी २३ (१५%), राकाँपच्या विश्लेषित १३२ पैकी १९ (१४%) , बसपाच्या विश्लेषित ७१ पैकी ५ (७%), समाजवादी पक्षाच्या विश्लेषित ६० पैकी ५ (८%) आणि AIMIM च्या विश्लेषित ४५ पैकी ३ (७%) उमेदवारांनी त्यांच्या विरोधात गुन्हेगारी प्रकरणं दाखल असल्याचे त्यांच्या प्रतिज्ञापत्रात घोषित केले आहे.

- **गंभीर स्वरूपाचे गुन्हेगारी प्रकरणं दाखल असलेले पक्षवार उमेदवार**: शिवसेनेच्या विश्लेषित केलेल्या १७३ पैकी २८ (१६%), काँग्रेस (आय) च्या विश्लेषित केलेल्या १७१ पैकी १६ (९%), मनसेच्या विश्लेषित केलेल्या १५४ पैकी २२ (१४%), भाजपच्या विश्लेषित केलेल्या १५१ पैकी १४ (९%), राकाँपच्या विश्लेषित १३२ पैकी १६ (१२%) , बसपाच्या विश्लेषित ७१ पैकी ४ (६%), , समाजवादी पक्षाच्या विश्लेषित ६० पैकी ४ (७%) आणि AIMIM च्या विश्लेषित ४५ पैकी २ (४%) उमेदवारांनी

त्यांच्या विरोधात गंभीर स्वरूपाचे गुन्हेगारी प्रकरणं दाखल असल्याचे त्यांच्या प्रतिज्ञापत्रात घोषित केले आहे.

## आर्थिक पार्श्वभूमी

- **कोट्यधीश उमेदवार**: विश्लेषित केलेल्या १६४१ पैकी ४८९ (३०%) उमेदवार कोट्यधीश आहेत.

- **सरासरी मालमत्ता**: बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक २०१७ मधील विश्लेषित केलेल्या उमेदवारांची सरासरी मालमत्ता रु. १.९३ कोटी इतकी आहे

- **शून्य मालमत्ता असलेले उमेदवार**: विश्लेषित केलेल्या १६४१ उमेदवारांपैकी १० उमेदवारांनी शून्य मालमत्ता असल्याचे घोषित केले आहे.

- **कमी मालमत्ता असलेले उमेदवार**: एकूण १०२ उमेदवारांनी रु.१,००,००० (एक लाख) पेक्षा कमी मालमत्ता असल्याचे घोषित केले आहे (शून्य मालमत्ता असल्याचे घोषित केलेले १० उमेदवार सोडून).

- **आयटीआर*मध्ये घोषित केल्याप्रमाणे उच्च उत्पन्न असलेले उमेदवार**: १६४१ उमेदवारांपैकी १३ उमेदवाराने वार्षिक उत्पन्न रु. ५० लाखा पेक्षा जास्त असल्याचे घोषित केले आहे

## इतर पार्श्वभूमीची माहिती

- **उमेदवारांच्या वयाची माहिती**: ७१ (४%) उमेदवारांनी त्यांचे वय २१ ते २४ च्या दरम्यान असल्याचे घोषित केले आहे. १२११ (७४%) उमेदवारांनी त्यांचे वय २५ ते ५० च्या दरम्यान असल्याचे तसेच ३५९ (२२%) उमेदवारांनी त्यांचे वय ५१ ते ८० च्या दरम्यान असल्याचे घोषित केले आहे.

- **उमेदवारांची लिंगविषयक माहिती**: विश्लेषित केलेल्या १६४१ उमेदवारांपैकी ८४८ (५२%) उमेदवार पुरुष आहेत तर ७९२ (४८%) महिला आहेत

# संपर्क

## महाराष्ट्र इलेक्शन वॉच

| अजित रानाडे | शरद कुमार | दीपक नेगी |
|---|---|---|
| संस्थापक सदस्य,<br>नॅशनल ईलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१-९७०२२ १५३१२<br>ajit.ranade@gmail.com | राज्य समन्व्यक<br><br>महाराष्ट्र इलेक्शन वॉच<br><br>+९१-९८६९ ४०३७२१<br>sharadkumar40@gmail.com | वरिष्ठ कार्यकारी सहायक<br><br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br><br>+९१-९८९२४ ०३१८६<br>deepak@adrindia.org |

## नॅशनल इलेक्शन वॉच/असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स

| मिडीया आणि पत्रकारांसाठी हेल्पलाईन | **मे.जन.अनिल वर्मा** (सेवानिवृत्त) | **प्रा. जगदीप चोक्कर** | **प्रा. त्रिलोचन शास्त्री** |
|---|---|---|---|
| <br>+९१ ८०१०३ ९४२४८<br>ईमेल: adr@adrindia.org | प्रमुख<br>नॅशनल ईलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>०११ ४१६५ ४२००<br>+९१ ८८२६४ ७९९१०<br>adr@adrIndia.org,<br>anilverma@adrindia.org | आयआयएम अहमदाबाद (सेवानिवृत्त)<br>संस्थापक सदस्य,<br>नॅशनल ईलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१ ९९९९६ २०९४४<br>jchhokar@gmail.com | आयआयएम बँगलोर<br>संस्थापक सदस्य,<br>नॅशनल ईलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१ ९४४८३ ५३२८५<br>trilochans@iimb.ernet.in |

## DISCLAIMER

All information about candidates, in this report has been taken from the affidavits filed online by Candidates along with their nomination papers on https://panchayatelection.maharashtra.gov.in/ and submitted to the Election Returning Officers appointed in **Municipal Corporation of Greater Mumbai** by State Election Commission, Maharashtra (SECM). **ADR does not add or subtract any information, unless the SECM changes the data. In particular, no unverified information from any other source is used.** While all efforts have been made to ensure that the information is in keeping with what is mentioned in the affidavits, in case of discrepancy between information in this report and that given in the affidavits, the information reported in the affidavits filed by Candidates should be treated as correct. Association for Democratic Reforms, Maharashtra Election Watch and their volunteers are not responsible or liable for any damage arising directly or indirectly from the publication of this report.